**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

---

२५ सप्टेंबर २०१८

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन यांची युजीसीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती

पुणे - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इंटरडिसिप्लिनरी स्कूल ऑफ हेल्थ सायन्स विभागाचे प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. जागतिक आरोग्य संघटनेचे (who) सल्लागार म्हणून काम पाहिलेल्या पटवर्धन यांना सुमारे तीन दशकांचा प्रदीर्घ संशोधनात्मक अनुभव आहे. याआधी त्यांनी सिम्बायोसिस विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची जबाबदारीही सांभाळली होती.

”डॉ. पटवर्धन यांची यूजीसीच्या उपाध्यक्षपदी झालेली निवड ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठी अत्यंत आनंदाची व अभिमानास्पद बाब आहे. विद्यापीठाने हाती घेतलेल्या अनेक नवीन उपक्रमांना आता अधिक पाठबळ मिळेल. याशिवाय एकूणच भारतातील इतर विद्यापीठांस डॉ. पटवर्धन यांच्या अनुभवाचा फायदा होऊ शकेल," अशी प्रतिक्रिया सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केली.

”विद्यापीठामध्ये गेली अनेक वर्षे केले संशोधन याचबरोबर मा. कुलगुरू व विद्यापीठातील इतर अनेक सहकाऱ्यांच्या वेळोवेळी मिळालेल्या सहकार्यामुळे ही जबाबदारी मिळाली आहे, असे मी मानतो. सध्याच्या परिस्थितीत उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. सगळ्यांनीच यासाठी एकत्रित काम करणे आवश्यक आहे. विशेषतः सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास यामध्ये भरीव सहभाग घेणे आवश्यक आहे. यूजीसीच्या उपाध्यक्षपदाची ही जबाबदारी अर्थातच मोठी आहे. मात्र सर्वांच्या सहकार्याने ती पार पडली जाईल, असा विश्वास वाटतो," अशी भावना डॉ. पटवर्धन यांनी या निवडीच्या पार्श्वभूमीवर व्यक्त केली.

---

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com